जा.क्र. ३४/२०२०
धर्मादाय आयुक्त भवन,
३ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दुरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक :- 04 JAN 2020

**परिपत्रक क्र.५०५ दिनांक** ०३/०१/२०२०

संदर्भ :- सदस्य सचिव, मुख्यमंत्री सहायता निधी यांच्या सोबतची
दिनांक ०२/०१/२०२० रोजीची बैठक.

या अधिकारीणीच्या संदर्भीत बैठकीमध्ये असे निदर्शनास आणून देण्यात आले की, बऱ्याचशा धर्मादाय रुग्णालयांमधुन निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरीता आर्थीक अर्थसहाय्य मिळणेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीमधुन मदत मिळणेकरीता अर्ज करण्यास सांगितले जाते व त्यासाठी संबंधित धर्मादाय रुग्णालयामधुन वैद्यकीय उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक दिले जाते. सदरच्या प्राप्त अर्जांची छाननी केली असता असे निदर्शनास आले आहे की, बरेच धर्मादाय रुग्णालये वैद्यकीय उपचाराच्या अंदाजपत्रकावर रुग्णालयाचे IPF Status व सदर रुग्णालय हे धर्मादाय असल्याचे नमुद करीत नाही त्यामुळे संभ्रम निर्माण होवुन विविध योजनेची अंमलबजावणी करणे अशक्य होते व यामुळे निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळण्याच्या शासनाच्या धोरणास खिळ लागते व परिणामत: रुग्णाला धर्मादाय रुग्णालयामध्ये सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार मिळण्यास बरीच पायपीट करावी लागते.

२. तरी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना आर्थीक अर्थसहाय्य मिळणेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीमधुन मदत मिळणेकरीता अडचण निर्माण होऊ नये यासाठी सर्व धर्मादाय रुग्णालयांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश करण्यात येत आहेत.

१) संबंधित रुणालय हे धर्मादाय असल्याचे रुग्णालयाच्या लेटरपॅडवर ठळक अक्षरामध्ये इंग्रजी व मराठी भाषेमध्ये **"CHARITY HOSPITAL/धर्मादाय रुग्णालय, Regn. No. / नोंदणी क्रमांक"** असे स्पष्ट नमुद करावे.

२) वैद्यकीय उपचाराच्या अंदाजपत्रकावर रुग्णालयाचे Current IPF Status नमुद असावे.

३) तसेच ज्या रुग्णालयाकडे IPF Fund शिल्लक आहे अशा रुग्णालयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधुन अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरीता रुग्णांचे अर्ज पाठवू नये.

३. सर्व अधिकाऱ्यांना व धर्मादाय रुग्णालयांना सुचित करण्यात येते की, त्यांनी वरील निर्देशांचे तात्काळ काटेकोरपणे पालन करावे.

Smehere
3-1-20

(संजय ग. मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)